**सांगोला महाविद्यालय, सांगोला**
**मुलींचे वसतिगृह मेस अटी व शर्ती**
**सन २०२३—२०२४**

१.रोज दोन वेळचे जेवण :— सुकीभाजी, पातळभाजी, वरण, भात, चपाती, लोणचे इ.

२.महिन्याातून चार वेळा फिस्ट : मेनू — एक गोड पदार्थ

(गुलाबजामूण / श्रीखंड / बासूंदी / खिर / जिलेबी / शिरा इ. )

मसालेभात,पुरी / चपाती / भजी / वडा,सॅलेड,

पापड, सुकीभाजी, पातळभाजी इ. फिस्ट च्या दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे जेवण राहील व संध्याकाळी फिस्ट असेल. महिन्यातून एकदा नॉनव्हेज जेवण दिले जाईल.

१. जेवणातून विषबाधा होणार नाही याची पूर्ण दक्षता घेईन, जर का झालेस त्याची पूर्ण जोखीम माझी स्वत:ची असेल.
२. जेवणातून सोडा किंवा तत्सम कोणताही पदार्थ वापरणार नाही.
३. अन्न पूर्णता शिजलेले / भाजलेले / तळलेले असेल कच्चे राहणार नाही याची दक्षता घेईन. जेवण तयार करण्यासाठी लागणारे खाद्य तेल व अन्नधान्य चांगल्या दर्जाचे असेल व ते निवडून पाकडून स्वच्छ करून वापरले जाईल. भाजीपाला स्वच्छ व ताजा असेल.
४. मेसमधील भांडयांची व मेस परिसराची स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी माझी असेल.
५. मेससाठी महाविद्यालयाने दिलेल्या साहित्याची मोडतोड होणे, हरविणे याची जबाबदारी माझी असेल. जर का नुकसान झालेस त्याची भरपाई देईन.
६. मेस दर प्रति महिना ————————गेस्टसाठी प्रति ताट रू.————शुल्क असेल
७. दहा किंवा दहा दिवसापेक्षा जास्तीचे खाडे पकडले जातील, सत्र आरंभ व सत्र समाप्ती महिन्यामध्ये प्रत्यक्ष हजर दिवसाचे मेस बील आकारले जाईल.
८. विद्यार्थीनींचे मेस बील परस्पर मेस चालकाने पावतीने जमा करून घ्यावे व व्यक्ती निहाय हिशोब लेखी स्वरूपामध्ये ठेवावा व संबंधीत दरमहा हिशोबाची झेरॉक्स प्रत महाविद्यालयाकडे जमा करावी.
९. मेस भाडे वार्षिक रू. ७०,०००/— (रू. सत्तर हजार फक्त.) दोन सत्रात व लाईट बील मीटर प्रमाणे प्रत्येक महिन्याचे ७ तारखेपूर्वी महाविद्यालयात जमा करावे.

१०. वसतिगृह व महाविद्यालय परिसरात कोणत्याही प्रकारचे नैतिक, आर्थिक व सामाजिक अध:पतन होणार नाही असे वर्तन ठेवीन.

११.मेस साठी सुरक्षा ठेव रूपये १,००,०००/— **मुलांचे व मुलींचे वसतिगृहासाठी स्वतंत्र** महाविद्यालयाकडे ठेवण्यास तयार आहे.

१२. मेस चालक मेस चालविणेस तयार नसल्यास किंवा महाविद्यालय प्रशासन मेस चालकाची मेस बंद करणार असल्यास अशा प्रकारची लेखी सूचना परस्परास दोन महिने अगोदर देणे बंधनकारक राहील.

१३. सर्व भोजनार्थींना सन्मानाची व विनम्र सेवा देईन.

वर नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही अटी व शर्तीचे उल्लंघन माझेकडून झाल्याचे प्राचार्य व संबंधीत यांचे निदर्शनास आल्यास आपण घ्याल तो निर्णय मला बंधनकारक असेल.